IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)

An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# दासू वैद्य यांच्या बालकविता : एक अभ्यास

**राहुल अनिलराव पाटील**

संशोधक विद्यार्थी

विषय :- मराठी, कला व मानव्यविद्या शाखा,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

संशोधन केंद्र :- म.गां.विद्यामंदिर संचलित कला,

विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मनमाड

**प्रा. डॉ. मीनाक्षी पुंडलिक पाटील**

पीएच.डी. संशोधन मार्गदर्शक

मराठी विभाग

महिलारत्न पुष्पाताई हिरे महिला

महाविद्यालय, मालेगाव

**सारांश (Abstract):**

लोकसाहित्य आणि बालजीवन यांचा अतूट संबंध असल्यामुळे बालकवितेचा उगम लोकगीतांत शोधता येतो. अंगाई, ओव्या, फुगड्या, उखाणे यांसारख्या लोकपरंपरेतून बालकवितेचा विकास झाला. रवींद्रनाथ टागोर यांनी जसा बालकवितेतील आदिम सौकुमार्याचा उल्लेख केला आहे, तसाच बालकवितेचा गोडवा आणि निरागसता ही तिची वैशिष्ट्ये ठरली. मराठी बालसाहित्यात प्रारंभी मुरलीधर कुलकर्णी, लक्ष्मीबाई टिळक, बालकवी, भा.रा.तांबे, साने गुरुजी, कुसुमाग्रज इत्यादींचे योगदान लक्षणीय राहिले. मराठवाड्यात बालसाहित्यलेखन उशिरा सुरू झाले, ज्यात त्र्यंबक वसेकर, सुभाष वसेकर, महावीर जोंधळे यांचा मोठा वाटा होता. या परंपरेचा वारसा पुढे दासू वैद्य यांनी समृद्ध केला. त्यांनी बालकांच्या मानसिकतेचा सूक्ष्म अभ्यास करून कल्पनारम्य, गेय आणि तर्कहीन पण रसपूर्ण अशा कवितांची निर्मिती केली. त्यांच्या 'क कवितेचा' (2009) या संग्रहात बालकांच्या प्रश्नांना, खेळांना कल्पनांना आणि निसर्गाशी असलेल्या नात्याला सर्जनशील अभिव्यक्ती मिळाली आहे. "माझे प्रश्न", "एकदा मी", गंमतपूरचे गंमतयार", "एक दिवस अचानक" या कविता बालकांच्या भावविश्वातील कुतूहल, गंमतजंमत आणि स्वप्नरंजन यांचे जिवंत चित्र उभे करतात. दासू वैद्य यांच्या कवितेत बालसुलभ कल्पकता, नादमाधुर्य, लय, यमक, नादानुकरण व जागतिकीकरणाशी निगडित संदर्भ सहजपणे मिसळलेले दिसतात. त्यांची कविता गेय, प्रसन्न आणि चिंतनशील असून मराठी बालकवितेत एक स्वतंत्र ओळख निर्माण करणारी आहे.

**बीज-शब्द:** लोकगीत, बालकविता, दासू वैद्य, कल्पनारम्यता, गेयता, बालभावविश्व, 'क कवितेचा'.

**प्रस्तावना**

लोकसाहित्यातील लोकगीतांचा बालजीवनाशी फारच निकटचा व जिव्हाळ्याचा संबंध असल्याने बालकवितेच्या इतिहासात प्रथम लोकगीतांचा विचार करणे महत्त्वाचे ठरेल. घरात दळणवळण करणाऱ्या श्रमकरी आईच्या तोंडून निघालेले तृप्ती, सुख, समाधानाचे हुंकार लोकगीतात आढळतात. लोकगीतांतून पुढे अंगाई, फुगडी, मॉडला, उखाणे, ओव्या यांचा जन्म झाला अशा लोकगीतातून बालगीतांचा शोध घेता येईल."लोकगीतांचा मुख्य गुण गेयता हाच दिसतो. सोप्या भाषेत गंमतीदार कल्पना मांडून मुलांचे मनोरजनया गीतांनी केले आहे."१ मूल जन्माला आल्याबरोबर त्याच्या कानावर आईचे अंगाईगीत पडते. अर्थातच त्यामुळे जन्मतःच मुलाला सुरांची ओळख झालेली असते. मूल जात्याच नादलुब्ध असते. त्याला आईचे गोड गुणगुणणे हसवते, खेळवते. गाण्याला अर्थ असो की नसो, ताल व ठेका असला की कोणतेही गाणे मुलाला आवडते. 'अडगुलं मडगुलं सोन्याचे कडगुलं, 'अंगाई अंगाई कोल्होबाची आई' या गीतांना काही अर्थ आहे का?तरी तो बालकांना आवडतात. पुनरुक्ती, नादमाधुर्य, तालबद्धता, चमत्कृतियुक्त कल्पना मुलांना आवडतात. आजींनी, आईनी मावशींनी मनापासून आळवलेली, किंबहुना आपल्या बाळांसाठी स्वतः रचलेली अशी गीते फार पूर्वीपासून चालत आलेली आहेत. अशी गीते मुलांना रडता रडता हसवतात, हसता हसता नाचवतात. त्यांचे शैशव नादलुब्ध करून टाकतात.

लोकगीतांप्रमाणेच काही बालगाणीही कोणी रचली याचा थांगपत्ताच लागत नाही. रवींद्रनाथ टागोर म्हणतात खोदल्याबरोबर मातीतून बाहेर पडणारा गंध किंवा बालकाच्या नवनीत कोमल देहाचा गेह उचळंबविणारा गंध, चंदन, गुलाबपाणी, अत्तर किंवा धूप यांच्यापैकी कोणत्याही सुगंधांना त्याची बरोबरी करता येणार नाही."ज्याप्रमाणे या सर्व सुगंधांपेक्षा मातीच्या गंधात किंवा बालकाच्या अंगगंधांत एक अपूर्व आदिमता आहे. त्याप्रमाणे बालगाण्यातही एक प्रकारचे आदिम सौकुमार्य आहे. त्या माधुर्याला बाहारस असे नाव दिलेले बरे. ती गाणी तीव्र नाहीत, गहन नाहीत, तो अंत्यत स्निग्ध, रसपूर्ण, तर्कहीन आणि सुसंगतिहीन अशी आहेत."२ खिया दळणकांडण करतांना ओव्या गात असल्याचे उल्लेख सातव्या- आठव्या शतकातील समाजजीवनातही सापडतात. बाळांच्या कौतुकमिश्रीत ओव्यांचे कर्तेपण समूहाकडे जाते. स्वयंस्फूर्तीने त्यांची रचना झाली आहे. एकीपासून दुसरीकडे, दुसरीपासून तिसरीकडे असा हा ओव्यांचा प्रवाह सतत वाहता राहिला आहे.

बाळाला झोपवतांना जसे अंगाईगीत म्हटले जाते, तसे बाळाचे रडू थांबवितांना त्याला हसवितांना, खेळवितांना, रिझवतांना घराघरांतून अनेक गाणी लोकपरंपरेने महटली गेली व आजही म्हटली जातात. बाळाच्या सकाळी उठण्यापासून ते रात्री झोपेपर्यंतच्या बाळलीला वर्णन करणारी अनेक गाणी आहेत. परंपरागत चालत आलेले 'अडगुलं मडगुलं, सोन्याचं कडगुलं, रुप्याचा वाळा, तान्ह्या बाळा हे गीत आपल्याकडे तान्हे बाळ हमखास ऐकते. तसंच न्हाऊन झालेल्या बाळाला मस्तपैकी तीट लावल्याच्या आनंदात 'टाळ्याबाई टाळ्या, पुरणाच्या पोळ्या हे गीत आई म्हणते. खेळही रंगतो तो 'आपडी थापडी गुळाची पापडी, धम्मकलाडू तेल पाइ' या बालगाण्याने. हा खेळ खेळतांना मुलांना एकमेकांचे कान धरण्यातमोठी गंमत वाटते. अशा प्रकारची बाळगाणी मुलांना सुखवितात. लोकगीते व्यक्तीशः रचली गेली तरी त्यांचे ते रूप राहत नाही. ती सामुहिक बनतात. अंगाई गीते जात्यावरच्या ओव्या, तुळशी वृंदावनापुढच्या ओव्या, वेगवेगळ्या सणांची गाणी पाळणे, नाती-गोती सांगणाऱ्या ओव्या यांना काही खास बालगीते म्हणता येणार नाही. मात्र "घरातल्या स्त्रियांच्या तोंडून वारंवार तो ऐकण्याचे भाग्य एकेकाळी मुलांना लाभत असे. तो सतत कानावर पडत, तोंडपाठ केली जात. त्यामुळे स्तनपानाद्वारे आईच्या दुधाचे संस्कार जसे नकळत तरीही परिणामकारक रीतीने मुलांवर होतात, तसेच हे संस्कार या लोकगीतांनी मुलांवर होत. लिखित साहित्याचे फार मोठे काम या मौखिक परंपरेने एकेकाळी साधले जात होते. असे निश्चितपणे म्हणता येईल."३ असे लीलावती भागवत यांनी म्हटले आहे.

मुलांसाठी स्वतंत्र कविता हा प्रकार फारसा प्रचलित झाला नव्हता तेव्हाचे छान छान गाणी' हे मुरलीधर कुलकर्णी (१९२३) यांचे पुस्तक. यातील गाणी वृत्तबद्ध आणि लयबद्ध असल्याने गेय आहेत. 'बालमेवा हे चरित्रात्मक काव्याचे पुस्तक वा.र. पुराणिक यांनी लिहिले. (१९२८). यांतील काव्यरचना सोपी, रसाळ आणि आकर्षक आहे. पुढे लक्ष्मीबाई टिळक, काशीताई नाटेकर, केशवसुत, ह. स. गोखले, बालकवी, भवानीशंकर पंडित, शांताराम आठवले, भा. रा. तांबे, म. का. कारखानीस, माधव ज्युलियन, यशवंत, ना. गं. लिमये, वा. गो. मायदेव, भ. श्री. पंडित, वा. ना. विगम, गोपीनाथ तळवलकर, ग. ह. पाटील, कुसुमाग्रज, साने गुरुजी, के. नारखेडे यांनी मराठी बालकवितेत दिलेले योगदान फार मोलाचे आहे.४ पुढे मराठी बालकविता नव्या जोमाने, नव्या विचाराने, नव्या गुणाने नटली नि वाढली.

मराठवाड्यात बालसाहित्यलेखनाची सुरुवात बरीच उशिराने झाली. त्यामुळे मराठवाड्याच्या बालसाहित्यलेखनाचा इतिहास पाच दशकांच्या फारसा मागे जात नाही. नांदेड येथे १९६० च्या सुमारास त्रिवक वसेकरांनी खास मुलांसाठी कथा-कविता लिहिल्याची नोंद आहे. चित्रकलेत उल्लेखनीय कार्य केलेल्या त्र्यंबक वसेकरांनी उत्तम संस्कारकथा आणि कविता बालसाहित्याला दिल्या. १९७० च्या दशकात प्रा. सुभाष वसेकरांच्या

कविता जोमाने सुरू झाल्या. त्यानंतर बालकवितांचा नवा अध्याय मराठवाड्यात सुरू केला तो महावीर जोंधळे यांनी. वैचारिक लेखन आणि वृत्तलेखनासाठी लेखणी झिजवणाऱ्या महावीर जोंधळे यांनी १९७३ च्या सुमारास बालसाहित्यातही उत्तम लेखन सुरू केले. पावसाचे पाय या त्यांच्या पहिल्या बालकवितासंग्रहाने महाराष्ट्राला मराठवाड्याचे योगदान जाणवून दिले. मागोमाग सुभाष वसेकरांच्या पऱ्यांची शाळा या बालकविता संग्रहाने राज्यभर प्रसिद्धी मिळवली. ज्येष्ठ कवी के. एस.देशमुख यांच्या स्वप्नपरी या बालकविता संग्रहालाही राज्यभर बहुमान मिळाला. त्यामुळे अर्थातच मराठवाड्यातील बालकवितेला चांगले प्रोत्साहन मिळाले. रमेश दीक्षित, धुंडीराज कहाळेकर, गणपत व्यास, विनय अपसिंगेकर अशी काही ठळक नावे कविता क्षेत्रात दिसू लागली. दासू वैद्य, लीला शिंदे, लक्ष्मीकांत कुलकर्णी, रसिका देशमुख, सुधाकर गाजरे, उद्धव भयवाळ, सुहासिनी इर्लेकर इत्यादींनी त्यांची पाठराखण केली. मुलांसाठीच्या मासिकांमधून, वर्तमानपत्रातून, दिवाळी अंकांमधून मराठवाड्यातील बालसाहित्यिकांच्या बाल कविता प्रसिद्ध होऊ लागल्या. जणू बालकवितांच्या लोकप्रियतेची लाट आली आणि त्यात अनेकांनी बालकविता रचल्या. चांगल्या दर्जाच्या कवितांबरोबर सुमार दर्जाच्या बालकवितांचे लेखन झाले, हेही या प्रवाहात घडत गेले.

**दासू वैद्य यांची बालकविता :**

कवी आणि गीतकार म्हणून दासू वैद्य मराठी साहित्यविश्वात सुपरिचित असले तरी त्यांनी ललीतलेख, एकांकिका, चित्रपट, जाहिरातपट व दूरचित्रवाणीवरील मालिकांसाठी लेखन केलेले आहे. विविध लेखनप्रकार त्यांनी लीलया हाताळले आहेत. चांगली कविता लिहिणारे चांगली बालकविता लिहितीलच असे दिसत नाही; मात्र दासू वैद्य यांनी बालसाहित्य क्षेत्रातही बालकांच्या मनाची जाण ठेवून तरल कल्पनाशक्तीने जागतिकीकरणाचे संदर्भ देत आपली कविता सजवणारा बालकवी अशी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. कवी म्हणून गेल्या दोन दशकातील दासू वैद्य यांची कामगिरी मोलाची ठरते. अनेक चित्रपटांची गीते. मालिकांची शीर्षकगीते, पटकथालेखन याद्वारे आपला इसा उमटवतानाच त्यांनी बालकवितेतही मोलाचे योगदान दिले आहे. वेगळ्या वळणाची बालकविता त्यांनी मराठी वाचकांना दिली आहे. त्यांचे बालकवितेचे लेखनसातत्य आहेच, मासिके, दिवाळी अंकातून त्यांच्या बालकविता प्रकाशित होत असतात. त्यांचे 'क कवितेचा' हे बालकवितेचे पुस्तक प्रकाशित आहे.

इ. स. २००९ मध्ये प्रकाशित झालेला क कवितेचा हा दासू वैद्य यांचा पहिलाच बालकवितासंग्रह. त्यांच्या बालकविता, मासिके, दिवाळी अंकांतून त्यापूर्वीही येत होत्या. क कवितेचा या संग्रहात एकूण एकतीस बालकविता असून बालकांच्या भावजीवनाशी एकरूप असलेल्या या कविता बालकांना खिळवून ठेवणाऱ्या आहेत. या संग्रहाला दोन राज्यस्तरीय सन्मानही प्राप्त झाले आहेत. क कवितेचा' हे शीर्षकच मोठे आकर्षक नि अर्थपूर्ण आहे. कवीने अर्पणपत्रिकेत काव्यात्मक पद्धतीने शीर्षकाचा अर्थ उलगडला आहे. तो मुलांना आणि मोठ्यांनाही भावणारा आहे. कवीने बालकांच्या भाव-भावनांचा, भावविश्वाचा.

आवडीनिवडींचा कल्पकतेचा नि वर्तनाचा सूक्ष्म निरीक्षणात्मक अभ्यास केल्याचे अनेक कवितांतून जाणवते. माझे प्रश्न' ही कल्पनात्मक कविता (Imaginative Poem) या संग्रहात आहे. या कवितेतला मुलगा म्हणतो-

बकासुराला भात किती ?

आजीबाईला दात किती ?

कॉम्प्युटरला हात किती ?

वायला किती पाय?

ढगोबाचं नाव काय ?

दुधावरती का साय ? ५

शंकरासुरासारखे अनेक प्रश्न सदानकदा पडणारी काही मुलं असतात. बकासुर म्हटला, की त्यांच्यासमोर गाडाभर भात, तो किती असेल, कसा शिजवला असेल असे प्रश्न उभे राहतात. तो किती महाकाय, मग त्याला किती दात असतील नि लगेचच बकासुराच्या दातावरून तो आजीबाईला किती दात असतील याचा तर्क लावण्याचा प्रयत्न करतो. त्याचवेळी एखाद्या राक्षसाला खूप हात असतात हे त्याने ऐकलेले असल्याने एकाच वेळी अनेक काम करणाऱ्या कॉम्प्युटरला किती हात असतील असा प्रश्न विचारतो. इथे कवी पुराणातला बकासूर, वर्तमानातली आजीबाई नि जागतिकीकरणाशी जोडणारा कॉम्प्युटर यांची सहजसुंदर सांगड घालताना दिसतो. अशा कल्पकतेतून स्वप्नसदृश्य कल्पकताही प्रकट होताना दिसते.

छोट्यांनाच का बसतो मार ?

खिचडीचाच का आंबट सार?

दोन आणि दोन का बरं चार ? प्रश्नामागचे प्रश्न चिन्ह उडाले तर?

माझे दप्तर नदीमध्ये बुडाले तर? ६

या संग्रहातली अशीच एक कल्पनारम्य कविता एकदा मी' ही आहे. मोठ्यांच्या सर्व गुणावगुणांचा वारसा मुले उचलत असतात. या कवितेचा निवेदक मोठ्यांच्या थापा मारणे, बढाया मारणे या अवगुणांचे अनुकरण करणारा वाताड्या थापाड्या आहे. तो म्हणतो-

एकदा मी पाऊस झालो वहात

वहात नदीत गेलो एकदा मी झाड झालो

धो धो पावसात खूप नहालो एकदा मी चंद्र झालो

चांदण्याची विजार ल्यालो

एकदा तर मी घार होऊन आभाळभर फिरून आलो

अहो एकदा तर मी कविता लिहिली,

तुम्हाला दाखवलीच असती

पण ती तर पावसात वाहुन गेली ७

तुम्हाला वाटेल कविता लिहिणं का सोप्पंय, पण मी कथासुध्दा लिहिली बरं का! पण काय सांगु

राव तीसुध्दा वाऱ्यावर उडून गेली अशा थापा मारता मारता तो एकदा आपण गुरुजी झालो नि मस्तपैकी टापटिप कपडे घालून शाळेतपण गेलो असे सांगतो. जसा मुलांना गुरूजींचा हेवा वाटतो. तसा आजोबांच्या काठीचा, बाबांच्या चष्म्याचा हेवा वाटतो. तसा त्यालाही वाटला म्हणून तो एकदा आजोबा झाला. एकदा चष्मा लावून बाबापण झाला. आपण दुसऱ्या कुणासारखं तरी व्हावा असं त्यांना सारखं वाटत असतं, तशी अनिवार होस त्यांना असते. ही होस ते खेळातून भागवण्याचा प्रयत्न करतात. कधी मनी वसे ते स्वप्नी दिसे' या म्हणीप्रमाणे स्वप्नातही हौस भागवतात. हाच धागा पकडून कवितेतला मुलगा शेवटी म्हणतो- वाटते.

एक खर सां का यारो.

एवढं सगळं मी स्वप्नात झालो ८

अशा गंमतीशीर कबुलीमुळे ही कविता मुलांना भावते, त्यांना ती आपली वाटतेच. दासू वैद्य यांच्या या संग्रहात कथात्म कवितेचाही प्रयोग आढळतो. कथात्म कवितेत (Narrative Poem) एखादी गोष्ट सांगितलेली असते. गंमतपूर गावच्या काही मित्रांची म्हणजे गंमतवारांची गमतीशीर काल्पनिक गोष्ट 'गंमतपूरचे गंमतयार' या कवितेत आहे.

गंमतपूरचे गंमतयार

निघाले एकदा गावापार एकाने लावली दोन शिंगे

दुसऱ्याने चढवले डोळ्यावर भिंग

तिसऱ्याचा थाट फारच न्यारा

डोक्यात भरला भणान् वारा

ढगाचा कोट एकाने शिवला एकाने टोपीवर चंद्र लावला " ९

या गंमतयारांनी गावापार निघताना कुणी दोन शिंगे लावली. एकाने चष्मा चढवला, एकाने ढगाचा कोट शिवला, एक वाऱ्याच्या वेगाने निघाला, एकाने तर टोपीवर चंद्रच लावला. अशी सगळी तयारी करुन निघालेल्या गंमतयारांनी काय काय गंमती केल्या, त्याची गोष्ट या कवितेत मुलांना रंगवून टाकते. 'सूर्य एकाने टाकला खिशात, डोंगर ठेवला लपवून मिशात अशी भन्नाट कल्पनाही कवीने यात वापरली आहे. एकूणच ही कविता वाचतांना मुलांना मज्जाच मज्जा वाटावी अशी ही रचना आहे.

एखाद्या घटनेचे चित्रण करणारी घटनात्मक कविता ( Incidental Poem) म्हणून या संग्रहातील 'एक दिवस अचानक ही कविता सांगता येईल- 'अचानक पोटात बी जाते नि ज्याच्या पोटात ते बी जाते त्याचेच एक बहारदार झाड होते ही नितांत सुंदर भन्नाट घटना या कवितेत अतिशय सुंदर चित्रित केली आहे.

खोडासारखे पाय आणि हातांनाही

पानं आली डोळे जागीच मिटुन गेले. कान दोन्ही हिरवे झाले डोक्यावरती

कावळ्यांनी काटक्यांचा खोपा केला

घर समजून एक पोपट कानामध्ये झोपी गेला.. १०

बी पोटात गेल्यानंतर मुलाच्या शरीरात कसकसे बदल होतात, त्यानंतर त्याचं झाड होतं नि झाड झाल्यावर त्याच्यावरती घरटं करणारे कावळे, घरटं समजून कानात शिरलेला पोपट, खांधावर बसुन कुहूकुहूकरणारी कोकीळा, सर्वांगभर गुदगुल्या करत सरसर फिरणारी खारुताई असं एका घटनेमुळे घडणाऱ्या घटनाक्रमाचं कवीने केलेलं वर्णन खूपच मजेशीर असल्याने ही कविता मुलांना खूप आवडते. गेयता है या कवितेचे आणखी एक वैशिष्ट्य. त्यामुळे या कवितचे छान गाणे झाले. ते प्रारंभीच्या काळात ध्वनीमुद्रित स्वरुपात महाराष्ट्रभर गाजले नि नंतर ध्वनिचित्रमुद्रित स्वरुपात आजही घराघरात ऐकले पाहिले जाते आहे.

क कवितेचा मध्ये माझे प्रश्न म्हणून प्रश्नांची सरबत्ती करुन नंतर प्रश्नचिन्हच गायब करणाऱ्या मुलाची कविता आहे. तरी निसर्गातल्या घटनांची गुपितं सांगणारी गुपित हो कविताही आहे. कप भरुन चहा हवा ही चहाचा हट्ट धरणाऱ्या हटवादी मुलाची कविता आहे, तशी शाळेतल्या आवडणाऱ्या नि समजूत घालून हासत प्रोत्साहन, प्रेरणा देणाऱ्या बाईची 'मराठीच्या बाई ही कृतज्ञभाव सांगणारी कविताही आहे. कडू कारल्याची, आंबट करीची गोड आंब्याची, लाडक्या बाहुलीची, हुपहुप माकडाची, झाडाची पानाची, बागेची, पावसाची, पुस्तकातल्या चित्राची गंमतीशीर मित्राची, शाळेला सुट्टीची अशा बालकांच्या भावविश्वातल्या विविध विषयांवरच्या कविता या संग्रहात आहेत. जागतिकीकरणाचे संदर्भ देत सहजपणे मुलांना माहिती तंत्रज्ञानाचे आपल्या जीवनातील सद्यःस्थितीतील अटळस्थान नि त्यावरची प्रगाढ श्रद्धा दाखवणारी नवी प्रार्थना या संग्रहाच्या शेवटी दिलेली

आहे.

हरे डॉट हरे डॉट डॉट डॉट हरे हरे

हरे कॉम हरे कॉम कॉम कॉम हरे हरे

ईमेल करोती संवादम

डॉट कॉमी मन रंगता

'व्हायरस' बुध्दी विनाशाय ईमेल डॉट कॉम नमोस्तुते। ११

वास्तवाचे भान राखत पुढे येणारी ही कविता बालकांच्या जाणिवांशी एकजीव होणारी आशयसंपन्न बालकविता म्हणता येईल. नव्या माध्यमातील भाषेचा संकर इथे आशयाशी एकरुप होताना दिसतो. ही कविता लयबद्ध नि बालकांच्या सुराशी जुळणारी आणि पाठांतरसुलभ असल्याने मुलांच्या जिभेवर रुळणारी ठरते. काळासोबतचे भान दासू वैद्य यांच्या कवितेत जागोजागी प्रकर्षाने जाणवणारे आहे. त्यामुळेच त्यांची कविता एकूण मराठी बालकवितेतले आपले स्वतंत्र अस्तित्व जाणवून देणारी आहे.

दासू वैद्य यांच्या एकूण कवितेची वाटचाल मंदगतीने होताना दिसते आणि बालकविताही त्याच पद्धतीने पुढे जाताना दिसते. मात्र त्यांची बालकविता ही ध्वनिफिती. ध्वनिचित्रफिती. दिवाळी अंक, बालकुमार विशेषांकांची मुखपृष्ठे, पोस्टरकविता इत्यादी प्रकारे अगदी जागतिक स्तरावरही गौरवास्पद स्थान मिळणारी आहे. हे या वाटचालीचा अभ्यास करताना सहजपणे लक्षात येते.

समारोप

दासू वैद्य यांनी साहित्याचे विविध प्रकार लीलया हाताळत त्यांचे मराठी साहित्यविश्वातील अढळस्थान अल्पावधीतच निश्चित केले. बालसाहित्यातही बालकांची मने ओळखून त्यांच्या भावविश्वात शिरुन बालसाहित्यात वेगळा ठसा उमटवणाऱ्या बालकवितेची निर्मिती करुन त्यांनी अतिशय मोलाचे योगदान दिले आहे. 'क कवितेचा' हे एकमेव पुस्तक त्यांनी बालसाहित्याला आजवर दिले असले, तरी तो बालसाहित्य विश्वातील अतिशय महत्त्वपूर्ण बालकवितासंग्रह आहे. बालकविता लेखनातील त्यांचे सातत्य वृत्तपत्रे, मासिके, दिवाळी अंकांतून प्रत्ययाला येते. कल्पनारम्यता हे दासू वैद्य यांच्या बालकवितेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. बालकांच्या विचारविश्वात शिरुन अफलातून कल्पना त्यांच्या कवितेत येतात. त्यांच्या कवितेतल्या मुलाच्या पोटात बी जाऊन कधी त्याचं बहावदार झाड होतं, तर कधी त्यांच्या कवितेतलं झाड ताडताड चालतं. त्यांच्या कवितेतला नायक कधी पाऊस होतो, कधी

झाड होतो, चंद्र होतो. घार होतो. सर होतो आणि मग काय घडतं तेही तो सांगतो. बालकाच्या मनातले विविध प्रश्न त्यांची कविता मांडताना दिसते नि अखेर प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्या प्रश्नामागचं प्रश्नचिन्हच उडाले तर? हाही अफलातून प्रश्न त्यांच्या कवितेत उभा राहतो. दासू वैद्य यांच्या कवितेत बालसुलभ कल्पकता आहे तशी गंमतजंमतही आहेच. घटनेचं चित्रदर्शन घडवणारी घटनात्मक कविता ही त्यांच्या काव्यसंग्रहात आहे. बालकांच्या मनातील भन्नाट कल्पनेमुळे घडणाऱ्या घटनेचे अतिशय सुंदर चित्रण त्यांच्या कवितेत आहे. 'कथात्म कविता' ही त्यांनी लिहिलेल्या आहेत. निसर्गातील घटनांची गुपिते सांगणाऱ्या शाळेतल्या मराठीच्या बाईबद्दल कृतज्ञभाव सांगणारी कविता, झाड, पान, फूल, बाग, शाळा, मित्र, चित्र, पाऊस अशा विविध विषयांवरच्या आशयसंपन्न कवितांची रचना दासू वैद्य यांनी केली आहे. मोजकी पण उत्तमोत्तम आगळीवेगळी काव्यरचना हे दासू वैद्य यांच्या बालकवितेचे वैशिष्ट्य सांगता येईल. तसेच अल्पाक्षरत्व अर्थात अत्यंत कमी शब्दात खूप काही आशय स्पष्ट करण्याची क्षमता त्यांच्या कवितेत आहे. त्यांची बालकविता जागतिकीकरणाचे संदर्भ जपणारी आहे. नाद, लय, ताल, यमक युक्त आणि नादानुकारी शब्दयोजनेमुळे त्यांच्या कवितेला गेयतेचे गुणवैशिष्ट्य आपसुकच चिकटते. त्यामुळे अनेक चित्रपट, मालिकांत त्यांची कविता गायली जाते.

## संदर्भ सूची

१. डॉ. शाह सुलभा, मराठी बालवाङ्मय स्वरुप आणि अपेक्षा, लीलावती प्रकाशन, धुळे, प्रथमावृत्ती २८ मार्च २००१ पृ. ७१

२.तत्रैव पृ. ७३

३.भागवत लीलावती, मराठी बालसाहित्य प्रवाह आणि स्वरुप, नवीन उद्योग, पुणे, प्रथमावृत्ती ६ सप्टेंबर१९७५. पृ. ४३

४. डॉ. शाह सुलभामराठी बालवाङ्मय स्वरुप आणि अपेक्षा, लीलावती प्रकाशन, धुळे, प्रथमावृत्ती १८मार्च २००१. पृ. १०१

५.वैद्य दासू क कवितेचा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई प्रकाशन, आ. २००९, पृ. ७

६.तत्रैव.पृ. ७

७. तत्रैव.पृ.११

८.तत्रैव. पृ. १९

९.तत्रैव पृ. २०

१०. तत्रैव पृ. ९

१२. तत्रैव पृ. ३६.